# घरकुल आनंदयात्रा

त्रैमासिक पत्रिका
अंक ८वा (जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २०२५)



आनंद नगर, त्रिंबक रोड, पिंपळगाव बहुला, नाशिक ४२०२१३ |संपर्क : ९८६०५५२३२४ / ९६९९०९१२३३
Email : gharkulparivar@gmail.com l Web : www.gharkulparivar.org


## संपादकीय ...

सप्रेम नमस्कार!

घरकुल आनंद यात्राचा हा आठवा अंक.

जानेवारी ते मार्च 2025 या काळातल्या घडामोडींचा आढावा तुम्हाला या अंकात वाचायला मिळेल. 2025 चं नवीन वर्ष सुरू झालं. या काळात घरकुलात आळसावलेलं वातावरण असेल का? अजिबात नाही. तो ना घरकुलचा स्वभाव, ना इथल्या मुलींचा, ना इथल्या ताई-मावशींचा. नवीन वर्षाच्या सुरुवातीला लगबग होती दरवर्षी इथे भरणाऱ्या '**अंतर्नाद**' या निवासी शिबिराची, त्याच्या नियोजनाची.

बऱ्याच दिवसांत मुलींना कुठे फिरायला नेलं नव्हतं, त्याचं नियोजन, पुढे येणाऱ्या उन्हाळी कामांचं नियोजन, या शिवाय नेहमी येणारे पाहुणे, जॉबवर्क, प्रॉडक्शन या कामांची गडबड होतीच. तर मुद्दा हा की घरकुल नेहमी गजबजलेले, उत्साहाने सळसळते असते आणि असणार.

या सगळ्याचा लेखाजोखा तुमच्यासोबत शेअर करायला हवाच. म्हणून हा लेखनप्रपंच.

पण तुम्हीही नुसतं वाचून बाजूला करू नका. तुमच्या सुचना, अभिप्राय जरूर कळवा, म्हणजे हा माध्यम संवाद दुतर्फा होईल.

बाकी सर्व उत्तमच!

***

-: संपादकीय मंडळ :-

| | |
|---|---|
| सौ. सुनिता आडके | सौ. साधना देशमुख |
| सौ. विद्या फडके | सौ. वल्लरी प्रधान |
| श्री. नरेश महाजन | डॉ. सुचिता संकपाळ |

# भेटीगाठी व कार्यक्रम

## जानेवारी २०२५



भारत विकास परिषदेच्या वतीने आयोजित होमिओपॅथी शिबिर आणि सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम




पोलीस रेझिंग डे निमित्त सातपूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री ज्ञानेश्वर भडांगे यांनी संस्थेला भेट दिली आणि विद्यार्थिनींशी संवाद साधला

# भेटीगाठी व कार्यक्रम

## जानेवारी २०२५



घरकुलमध्ये आनंदमेळा आयोजित करण्यात आला



SMRK कॉलेजच्या विद्यार्थिनींनी घरकुलच्या मुलींचा 'रंग दे भारत' हा कार्यक्रम घेतला.

गृहिणी उद्योगच्या शिक्षकांनी संस्थेच्या काही मुली व काही शिक्षकांना बास्केट विणणे शिकवले



# भेटीगाठी व कार्यक्रम

## जानेवारी २०२५



संदीप युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थी व शिक्षकांनी संस्थेला भेट दिली




घरकुलच्या विद्यार्थिनी आणि शिक्षिकांची हिवाळी सहल चांदवड आणि नस्तनपूर येथे नेण्यात आली

# भेटीगाठी व कार्यक्रम

## फेब्रुवारी २०२५




अंतर्नाद शिबिराचे उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुण्या डॉ पूजा सोनखास्कर यांचे स्वागत करताना उमेशभाई राठी आणि आडके मॅडम




अंतर्नाद शिबिरात मानसशास्त्रज्ञ साक्षी देशमुख विद्यार्थिनींशी संवाद साधताना

# भेटीगाठी व कार्यक्रम

## फेब्रुवारी २०२५



शिबिरात सहभागी सर्व विद्यार्थीनी आणि घरकुलचा स्टाफ



साधना सहस्त्रबुद्धे मंडला आर्ट थेरेपीवर सेशन घेताना




रूपाली पवार यांनी स्वसंरक्षण या विषयावर प्रात्याक्षिकांसह मार्गदर्शन केले

# भेटीगाठी व कार्यक्रम

## फेब्रुवारी २०२५




डॉ ऋचा सुळे यांनी मानसिक दिव्यांगत्व यावर मार्गदर्शन केले



सॅम अँड जेस हेअर अँड मेकअप एकॅडेमीतर्फे घरकुलच्या विद्यार्थींनीसाठी फ्री हेअर कटिंग सर्व्हिस देण्यात आली

# भेटीगाठी व कार्यक्रम

## फेब्रुवारी २०२५




शिबिरासाठी आलेले मान्यवर



फेस योगा शिबिरातील एक क्षण

# भेटीगाठी व कार्यक्रम

## मार्च २०२५



कोर्टयार्ड मेरियटमध्ये घरकुलचा स्टॉल



हॉटेल रॅडिसन ब्लूमध्ये घरकुलचा स्टॉल

# भेटीगाठी व कार्यक्रम

## मार्च २०२५



एचपीटी कॉलेजच्या विद्यार्थिनींनी OJT प्रोग्रामअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले आणि घरकुलच्या मुलींना वेगवेगळ्या activities शिकवल्या



घरकुलमध्ये होळीपूजन झाले

# भेटीगाठी व कार्यक्रम

## मार्च २०२५



नववर्ष स्वागत बहुउद्देशीय संस्था, नाशिक आयोजित 'जल्लोष नववर्षाचा' या कार्यक्रमात सुप्रसिद्ध मराठी अभिनेते माननीय श्री शरद पोंक्षे व नाशिक कलाभूषण पुरस्काराचे मानकरी श्री धनंजय वाबळे, यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात घरकुलच्या विद्यार्थिनींनी गणेश वंदना सादर केली.



# आधारस्तंभ - श्री राजेंद्र जी गोठी



आनंदयात्राच्या मागच्या काही अंकांमध्ये घरकुलची कहाणी सांगताना श्री राजेंद्र गोठींचा उल्लेख आला आहे. पिंपळगाव बहुल्याला घरकुल स्थिरावले ते श्री राजेंद्र गोठी यांच्यामुळेच.

श्री गोठी हे एक व्यावसायिक आहेत. त्यांचा आणि घरकुलचा ऋणानुबंध जुळला तो त्यांच्या पिंकीमुळे. त्यांना व त्यांच्या पत्नीला परदेशी जायचे होते, त्यावेळेला त्यांची मानसिक दिव्यांगत्व असलेली मुलगी पिंकी हिला कुठे ठेवावे हा त्यांच्यापुढे प्रश्न होता. त्यावेळी त्यांनी घरकुलचा शोध घेतला आणि नंतर पिंकीचा घरकुल मध्ये प्रवेश झाला.

आऊ माऊ बंगल्यातून घरकुल पाथर्डी फाट्यावरच्या बंगल्यात आलं कारण आधीच्या ठिकाणी जागेच्या कमतरतेमुळे बऱ्याच अडचणी यायच्या. सगळ्या ॲक्टिव्हिटीज मोकळेपणे घेता यायच्या नाहीत. तेव्हाच घरकुलसाठी योग्य अशा हक्काच्या जागेचा शोध सुरू झाला होता.

एक पालक म्हणून श्री. गोठी यांना घरकुलची ही विंचवाच्या बिऱ्हाडासारखी होणारी हलवाहलवी पहावेना. तेव्हा त्यांनी डॉक्टर सुळे, मी, आडके मॅडम यांच्याकडे एक विचार बोलून दाखवला.

ते म्हणाले, "त्र्यंबकेश्वरकडे जाताना पिंपळगाव बहुला हे गाव आहे, रस्त्यालगतच तिथं माझा प्लॉट आहे, मी तुमच्या गरजेनुसार तिथे घरकुलच्या मुलींसाठी इमारत बांधून देतो, तुम्ही तिथे छान काम करू शकाल."

आम्ही सगळ्यांनी विचार केला जागा बघून तर येऊ मग ठरवू. तोपर्यंत आम्हाला कोणाला ना हे गाव माहिती होते, ना काही भव्य इमारतीचे स्वप्न डोळ्यासमोर होते.

ठरल्याप्रमाणे आम्ही प्लॉट बघितला. प्लॉट तर बऱ्यापैकी मोठा होता, मात्र नाशिकपासून अंतर खूप होते. अशात यायला जायला त्रास होईल का? असा प्रश्न पडला. पण एक मात्र होतं की मुलींसाठी कार्यशाळा सुरू करण्याच्या दृष्टीने ही जागा इंडस्ट्रियल एरिया - सातपूर तसंच अंबडपासून पाच ते सात किलोमीटरच्या परिसरात होती. म्हटलं तर शहराला लागून असणार पण खेड्याची शांतता देणारं हे गाव संस्थेच्या मुलींच्या दृष्टीने आम्हाला योग्य वाटलं. पिंपळगाव बहुल्याच्या नकाशात घरकुलचे स्थान पक्क झालं.

श्री गोठी यांनी घेतलेल्या या पुढाकारात त्यांची आर्किटेक्ट कन्या आणि पिंकीची बहिण राखी टकले हिनेही महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. तिने माझ्याशी वारंवार चर्चा करून मुलींच्या राहण्याच्या, काम करण्याच्या दृष्टीने इमारतीचे डिझाईन तयार केले.

# आधारस्तंभ - श्री राजेंद्र जी गोठी

2013 साली घरकुल पिंपळगाव बहुलाच्या प्रशस्त इमारतीत स्थलांतरित झालं. या इमारतीने घरकुलची भ्रमती थांबवली. पिंकी त्यावेळी घरकुल मध्येच राहत होती. तिला घरकुलमध्ये रहायला आवडायचे ,पण काही वर्षांपूर्वीच तिला अर्धांगवायूचा झटका आल्याने ती सध्या घरी असते.

2013 मध्ये 30 मुली होत्या. सर्व सोयींनी युक्त अशी प्रशस्त इमारत मिळाल्यामुळे मुली पण आनंदी झाल्या. या जागेत मोठा हॉल असल्यामुळे त्यावेळी बॉलपेन असेंबलींगचे जॉब वर्क घेता आले जे आजतागायत सुरू आहे.

मुलींना या कामामुळे एक वेगळ्या प्रकारचा आत्मविश्वास मिळाला. घरकुलच्या 18 - 19 वर्षाच्या वाटचालीत श्री राजेंद्र गोठींसारखे आधारस्तंभ आमची स्वप्नपूर्ती करणारे ठरले.

आजही ही इमारत घरकुल भाडेतत्त्वावर वापरत असून वेगवेगळे प्रोडक्शन युनिट्स या इमारतीमध्ये कार्यरत आहे. बॉलपेन जुळणी, शिवणकाम, शाडू गणपती, बास्केट बनविणे, विक्री केंद्र इथे चालू आहेत.

याशिवाय 24 मुलींची राहण्याची सोय इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर आहे. तीन वर्षापासून घरकुल तर्फे आयोजित केले जाणाऱ्या 'अंतर्नाद' निवासी शिबिरासाठी येणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या राहण्याची सोय देखील या इमारतीत होते.

श्री राजेंद्र गोठी यांनी त्यावेळी स्वतःहून हा प्रस्ताव दिला नसता तर कदाचित आज घरकुल कुठेतरी दुसरीकडे उभे असते. पुढे जेव्हा ही इमारत कमी पडू लागली आणि मुली वाढू लागल्या त्यावेळी घरकुलची स्वतःची इमारत असावी असे वाटू लागलं. तेव्हा पुन्हा श्री गोठीनी याच परिसरातील त्यांचा दुसरा प्लॉट दाखवला आणि आजच्या इमारतीची पायाभरणी झाली. मागच्याच महिन्यात घरकुलच्या भविष्यकालीन प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली गेली. तो प्लॉट देखील संस्थेने श्री गोठी यांच्याकडून खरेदी केला होता, तिथे आता नवा प्रकल्प आकार घेणार आहे त्याविषयी पुढे माहिती येईलच.

हा प्लॉट देखील संस्थेने श्री गोठी यांच्याकडून खरेदी केला आहे. इथे आता नवा प्रकल्प आकार घेणार आहे, त्याविषयी पुढे माहिती येईलच.

पिंपळगाव बहुला हे शहरालगतच छोटं गाव असलं तरी आज ते नाशिक महानगरपालिकेत असल्याने शहराच्या सोयीसुविधा आणि गावातलं कौटुंबिक वातावरण असा दुहेरी फायदा मिळतो. याशिवाय गावाने घरकुलसाठी सेवाभावाने काम करणाऱ्या सेविका कर्मचारी दिल्या आणि घरकुलने त्यांना आत्मसन्मानासह कमावते केले. या सर्वांच्या मुळाशी श्री राजेंद्र गोठी यांच्यासारखे खंदे आधारस्तंभ घरकुलला लाभले त्यासाठी मी व्यक्तिशः त्यांची ऋणी आहे.

**- विद्या फडके**

# विश्वासू सहकारी



## जयश्री रघुनाथ कुशारे

जयश्री कुशारे 2016 साली घरकुल मध्ये रुजू झाली. ती आली त्यावेळेस तिला कुठल्याच प्रकारचा अनुभव नव्हता. तिने पूर्वी अशाप्रकारचं काम केलं नव्हतं. तिचं शिक्षणही फक्त बारावी झालेलं होतं.

मात्र घरकुलमध्ये आल्यानंतर तिच्यातले गुण हेरून विद्याताईंनी तिला प्रॉडक्शन मधल्या छोट्या छोट्या जबाबदाऱ्या दिल्या. क्रिएटिव्ह आर्टमधल्या काही गोष्टी बनवून घेणे हे ती चटकन आत्मसात करत होती. पाहता

पाहता जयश्री आकाश कंदील, इतर कलाकृतीच्या वस्तू बनवणे यामध्ये अगदी तरबेज झाली. अचूक माप घेणे, आणि एखादी गोष्ट कशी बनवायची याची कृती पटकन शिकणे, ही जयश्रीची खासियत.

घरकुलचा स्टॉल कंपनीत किंवा बाहेर प्रदर्शनात लावला की तिथे जयश्री ताईचे असणे आवश्यक असते. कारण घरकुलच्या प्रॉडक्ट विषयी ती अत्यंत आत्मीयतेने माहिती देते.

सध्या ती प्रॉडक्ट मॅनेजर म्हणून काम पाहते आहे. एखाद्या नवीन प्रॉडक्टची संकल्पना बाईंकडून समजून घेऊन लगेच ते प्रॉडक्ट करून पाहणे ही तिची विशेष आवड!

साधारण 15 ते 20 मुलींना जयश्रीताईने आकाश कंदील बनवणे, इतर कलाकुसरीच्या वस्तू बनवणे या कामात अगदी पारंगत केले आहे.

जयश्रीताई ही शीघ्र कवियत्री आहे. तिने घरकुलवर, घरकुलच्या विद्यार्थांवर अनेकदा उत्स्फुर्तपणे भावपूर्ण कविता केलेल्या आहेत आणि त्याचे सादरीकरण देखील केलेले आहे.

जयश्रीताईला रोटरी क्लब ऑफ नाशिक आयोजित कार्यक्रमात ‘नेशन बिल्डर अवॉर्ड’, शिक्षक दिनानिमित्त ‘राष्ट्रनिर्माता पुरस्कार’ मिळालेले आहेत.

रोटरी क्लब ऑफ नाशिक रिव्हर साईडतर्फे तिला प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

अशी ही जयश्रीताई घरकुल मधील एक विश्वासू सहकारी आहे.



## पोर्णिमा मनोहर सोहनी

घरकुल परिवार संस्थेत पौर्णिमा 2015 साली आली. ती मुळची बेंगलोरची. आईवडील गेल्यानंतर पौर्णिमाचा सांभाळ करण्यात इतर नातेवाईकांनी उदासिनता दाखवली. त्यामुळे लांबच्या नात्यातील एक दादावहिनी, श्री व सौ नाडीग यांनी पौर्णिमाचे पालकत्व घेतले. त्यांनी पौर्णिमाला मानसिक दिव्यांगांसाठी असलेल्या एका शाळेत घातले. पण ते पौर्णिमासाठी निवासी संस्थेचा शोध घेत होते.
त्यांना घरकुलची माहिती मिळाली आणि 2015 साली पौर्णिमा घरकुल संस्थेत दाखल झाली. गेल्या दहा वर्षांत पौर्णिमाची अतिशय चांगली प्रगती झाली असून ती इथल्या मुलींमध्ये छान मिसळून गेली आहे, रमली आहे. तिने घरकुलचे वातावरण पटकन आत्मसात केले.
पौर्णिमा स्वभावाने शांत, शिस्त पाळणारी, नीटनेटकी राहाणारी मुलगी आहे. भाजी निवडणे, पेनाचे काम करणे, एखाद्या मुलीचा हात धरून तिला चढाउतरायला मदत करणे अशी कामे ती मनापासून करते. तिला कधी आरडाओरडा करताना कोणी बघितलेले नाही.
तिच्या वहिनी तिला सुट्टीत घरी घेऊन जातात आणि तिच्या सगळ्या गरजा पूर्ण करतात. त्यामुळे तिचे तिच्या वहिनीशी आणि भाचीशी छान नाते जुळले आहे. घरकुलमधल्या ताया-मावशींशीही ती अगदी व्यवस्थित वागते.
पौर्णिमाला '**भारत माझा देश आहे**' ही प्रतिज्ञा पूर्ण पाठ आहे.
पौर्णिमा सोहनी ही घरकुलमधली सगळ्यांना हवीहवीशी वाटणारी विद्यार्थिनी आहे. तिच्या वहिनी तिला अधूनमधून भेटायला येतात. पौर्णिमा पेनाचे काम व्यवस्थित करते. तिला पेनाचे काम नसेल तर तिला कंटाळा येतो. पेन कधी येणार म्हणून ती विचारते.
पौर्णिमाला मराठी वाचता येत नाही. ती थोडंफार इंग्रजी वाचू शकते. स्वतःचं नाव इंग्लिशमध्ये लिहू शकते. तिला एबीसीडी आणि वन टू हंड्रेड लिहिता येतात. तिला '**काळोखाच्या वाटेवर**' ही कविता पाठ आहे. तिचा स्वभाव शांत आहे. कधी ती चिडलीच तर लवकर शांतही होते.
आमच्या घरकुलमधील ती एक '**Good Girl**' आहे.

# आठवणी ‘अंतर्नाद’ शिबिराच्या

सर्वप्रथम घरकुलच्या सर्व ताई, आई, मॅडम आणि घरकुलमधील मुली यांना आमच्या सर्व विद्यार्थिनींकडून मानाचा मुजरा.
घरकुल म्हणजे महिलांनी महिलांसाठी चालवलेली सर्वोत्कृष्ट संस्था आहे.
ही संस्था अपंग व मतिमंद महिलांसाठी सन्मानाने जीवन जगायला शिकवते. मला या संस्थेच्या शिबिरात सहभागी होता आले हे मी माझे भाग्य समजते. या शिबिरातील वेगवेगळ्या सत्रांमध्ये आलेल्या मान्यवरांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले त्यातून विद्यार्थिनींसाठी समाजाविषयी विचार करण्याचा दृष्टिकोन तयार झाला.
धन्यवाद!

**-जयश्री भाऊकाका भालके MSW-II**
**समाजकार्य महाविद्यालय नाशिक**

घरकुलमधल्या या तीन दिवसांच्या सेशनमधून आम्ही अनमोल मोत्याची शिदोरी घेऊन चाललो आहोत. घरकुलचे तळागाळापासून ते वरपर्यंत व्यवस्थापन एकदम छान आहे. या तीन दिवसीय शिबिरातून आम्ही प्रेम, करूणा, माणुसकी, संवेदनशीलता, आदर आणि शिस्त या मुल्यांची शिदोरी घेऊन जात आहोत.
कायदा, समाजभान आणि ताणतणावांचे व्यवस्थापन या या सर्व संकल्पनांचे ज्ञान मिळवण्याची संधी आम्हाला इथे मिळाली.
विद्या मॅडमसाठी एक विनंती आहे, हे शिबिर म्हणजे तुमच्यासाठीही चांगला अनुभव असेल पण कोणत्याही सहज मिळालेल्या गोष्टीची किंमत नसते, त्यामुळे तुमच्या मतानुसार, तसेच तुम्हाला उपलब्ध असलेल्या पर्यायानुसार तुम्ही पुढे ठरवावे ही विनंती.
घरकुल परिवाराकडून आम्हाला जी ज्ञानाची शिदोरी मिळाली आहे, तिचा आम्ही आमच्या आयुष्यात जरूर उपयोग करू. आपल्या परिवारात येण्याची संधी दिली त्याबदद्ल मी घरकुलचे खूप खूप आभार मानते.

**- योगिता निंबाळकर, MSW**
**समाजकार्य महाविद्यालय, नाशिक**

# अभ्यागतांच्या लेखणीतून

आज 25 जानेवारी 2025, शनिवार आणि एकादशीचा दिवस. माझ्यासाठी जणू
‘**अजि सोनियाचा दिनू**’ असं भासवणारा ठरला.
मी माझ्या आयुष्यातील **61 वर्षं** सरल्यावर घरकुल परिवाराशी जोडले गेले. निमित्त ठरले माझा वाढदिवस. या परिवाराशी जोडले जाणे हे मी माझे परमभाग्य समजते. इतक्या आपुलकीने, प्रेमाने केलेले औक्षण, गाण्यांचे सादरीकरण, पैठणीवरील कविता, यामुळे माझे हृदय आनंदाने भरून आले. इथे आल्यानंतर खऱ्या अर्थाने ‘**Home Away from Home**’ ची जाणीव झाली.
या संस्थेच्या यशस्वी कामगिरीमागे असणाऱ्या आधारस्तंभ आदरणीय विद्याताई फडके, साधनाताई, सुचेताताई, सुनिताताई आणि सगळ्या माऊल्यांना माझा साष्टांग दंडवत आणि मनःपूर्वक शुभेच्छा.
श्रीमती साधना देशमुख मॅडमने मला जी संधी दिली आणि माझ्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे सुंदर नियोजन करून माझा वाढदिवस अनोख्या रितीने साजरा केला, त्याबददल शतशः आभार.

**All the best to you all!**

**कविता पाटील,**
**लायन्स क्लब ऑफ इंजिनिअर्स, नाशिक**

# आदरांजली



घरकुलची विद्यार्थिनी स्मिता पाटील हिचे वडील

**श्री मनोहर आहेर पाटील**

यांचे 25 एप्रिल 2025 रोजी दुःखद निधन झाले.
त्यांना घरकुल परिवाराच्या वतीने विनम्र श्रद्धांजली.

# कृतज्ञतेचा नमस्कार

'एखादे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण मनापासून ध्यास घेतो, तेव्हा ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी संपूर्ण विश्व तुम्हाला साहाय्यभूत होते,' असे म्हणतात ते खोटे नाही.
घरकुल सुरू झाल्यापासून आतापर्यंत अनेक व्यक्ति, संस्था, कंपन्या यांच्याकडून वेगवेगळ्या स्वरूपात योगदान व सहकार्य मिळाले. त्यामुळे आमचा 17-18 वर्षांचा हा प्रवास सोपा झाला.
समाजाच्या सर्व स्तरातून मिळालेल्या सहयोगामुळे, प्रेमामुळे आम्हाला आमच्या मुलींना एक आनंददायी आणि दर्जेदार वातावरण देता आले.
यामुळेच घरकुल एक संस्था न रहाता एक संयुक्त कुटुंब बनले आणि आश्वासक वाटचाल करत आहे.
त्यासाठी भविष्यातही आपल्या सर्वांची साथ, सहकार्य आणि जिव्हाळा हवाय.
आपल्या प्रत्येकाविषयी आमच्या मनात असलेल्या भावना शब्दांत मांडणे कठीण आहे मात्र आपल्या प्रत्येकाच्या प्रेमाची नोंद आम्ही मनोमनी जपत राहू,
सर्व ज्ञात, अज्ञात मान्यवरांना, हितचिंतकांना, देणगीदारांना धन्यवाद आणि कृतज्ञतेचा नमस्कार!
घरकुल आपले ऋणी आहे. तसेच आपणा सर्व मान्यवरांचे, हितचिंतकांचे घरकुलात कायम स्वागत आहे.

## * आवाहन *

## -: ऑनलाईन देणगीसाठी :-

देणगीस ८०जी अन्वये आयकरात सुट

A/C Name : Gharkul Parivar Sanstha
Bank Name : Bank of India
Branch : Shivaji Udyan, Nashik
A/C No. : 080610110000256
IFSC : BKID0000806